# प्रेस नोट

पिंपरी पोलीस स्टेशन
पिंपरी चिंचवड शहर
दिनांक :-२५/०४/२०२३

## पिंपरी पोलीस स्टेशन येथे सुसज्ज महिला कक्ष व हिरकणी कक्षाचे उद्घाटन

---

पिंपरी पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड येथे असलेल्या महिला कर्मचारी व बाहेरुन तक्रार देण्यास आलेल्या महिला तक्रारदार यांना स्वच्छतागृह व फिडींग कक्ष उपलब्ध नसल्याने वरिष्ठ पोलीस निरिक्षक पिंपरी पोलीस स्टेशन यांनी केएसबी कंपणीचे मॅनेजींग डायरेक्टर श्री राजीव जैन यांना पिंपरी पोलीस स्टेशन कडील महिलांसाठी एक सुसज्ज विश्रांतीकक्ष व हिरकणी कक्ष बांधुन देण्याची विनंती केली ते केएसबी कंपणीने कबूल करुन महिलांसाठी एक सुसज्ज विश्रांतीकक्ष, एक प्रशस्त हॉल , विश्रांती कक्ष व हिरकणी कक्ष बांधून दिला त्याचे उद्घाटन दि २५/०४/२०२३ रोजी सायंकाळी १७/५५ वा मा पोलीस आयुक्त सो श्री विनयकुमार चौबे यांचे शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले. सदरवेळी मा आयुक्त सो यांनी मत व्यक्त करताना सांगीतले की केएसबी लिमिटेड कंपणी ही मल्टीनॅशनल कंपणी असून त्यांनी सामाजीक बांधीलकी जपून पोलीसांसाठी केलेले काम हे वाखनण्याजोगे आहे. तसेच पोलीसांनाही या योगदानाचे सामाजीक बांधकलिकीचे भान ठेवून काम करावे असे मत व्यक्त केले. तसेच केएसबी लिमिटेडचे एचआडी श्री शिरिष कुलकर्णी यांनी पिंपरी पोलीस स्टेशन येथे बांधून दिलेल्या महिला कक्षाबाबत आम्ही पिंपरी चिंचवड पोलीसांसाठी एक खारीचा वाटा दिला असून त्याच्या लाख पठीने पिंपरी चिंचवड पोलीसांचे काम आहे अशा भावना व्यक्त केल्या.

सदर कार्यक्रमास मा पोलीस आयुक्त यांचेसह , मा अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ श्री संजय शिंदे , मा पोलीस उपायुक्त सो विवेक पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रेरणा कट्टे, पिंपरी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री शंकर आवताडे , तसेच केएसबी लिमिटेडचे श्री राजीव जैन मॅनेजिंग डायरेक्टर , केएसबी लिमिटेडचे एचआडी श्री शिरिष कुलकर्णी यांचेसह केएसबीचे अधिकारी स्टाफ तसेच पिंपरी पोलीस स्टेशन कडील पोलीस अधिकारी अंमलदार तसेच शांतता कमिटीचे महिला सौ दिपाली देशमुख ,सौ कविता खराडे, सौ अमृता वैद्य यादी मान्यवर उपस्थीत होते. पिंपरी पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री शंकर आवताडे यांनी केएसबी लिमिटेड चे व उपस्थीताचे आभार व्यक्त केले.

Scanned with OKEN Scanner